प-१८

अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र :अतिमआ(ज)/एलओ/ १६३८
दिनांक : १८/०८/२०२०

## – कार्यालय परिपत्रक –

**विषय : महापालिका अधिकारी /कर्मचारी आरोग्य सशक्तीकरण योजना-२०१०**
संदर्भ : १. मा.मनपा सभा ठ.क्र.२३६, दि.२५/१०/२०१०.
२. कार्यालय परिपत्रक जावक क्र. अमआ/सका/९६८, दि.३०/११/२०१०.

संदर्भ क्र. १ व २ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार पुणे महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी 'महापालिका अधिकारी/कर्मचारी आरोग्य सशक्तीकरण योजना-२०१०' राबविणेत येत आहे.

वरील योजनेनुसार महापालिकेतील वर्ग अ ते ड मधील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांनी ज्यांचे वय ५० किंवा त्यापेक्षा जास्त आहे त्यांनी वर्षातून किमान एक वेळा प्राथमिक आरोग्य तपासणी दरवर्षी माहे जून अखेर करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

सद्या कोव्हीड-१९ या विषाणूची साथ चालू असल्यामुळे महानगरपालिकेच्या व खाजगी रूग्णालयांमध्ये कोव्हीड-१९ रूग्णांचा ताण येत असून अधिकारी/सेवकांना वैद्यकीय तपासण्या करणेकरीता पाठविणे अडचणीचे व धोक्याचे होत आहे.

ही वस्तुस्थिती विचारात घेता, महापालिका अधिकारी/कर्मचारी आरोग्य सशक्तीकरण योजना-२०१० ऑक्टोबर, २०२० पर्यंत स्थगित ठेवण्यात येत आहे.

सबब वेतनवाढ मंजूरीकरीता अधिकारी/कर्मचारी यांना आरोग्य तपासणी अहवाल दिनांक १५ नोव्हेंबर, २०२० पर्यंत सादर करण्यास सवलत देण्यात येत आहे. विहित करण्यात आलेल्या दिनांकापूर्वी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी आरोग्य तपासणी अहवाल सादर न केल्यास त्यांना माहे नोव्हेंबर पेड इन डिसेंबर, २०२० चे वेतन जुलै, २०२० पूर्वीच्या मुळ आकारणीनुसार आदा करणेत यावे.

वरील बाबीची माहिती सर्व अधिकारी/कर्मचारी यांना देण्याची दक्षता सर्व संबंधित खातेप्रमुख यांनी घ्यावी.

Rubal

(रूबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका.

प्रत :
मा. सर्व खातेप्रमुख/महापालिका सहाय्यक आयुक्त/ विभागप्रमुख,
यांजकडेस पुढील कार्यवाहीसाठी..